# Washim District Police

**Nature of Work** :- **'Dial 112' प्रतिसाद वेळेत वाशिम पोलीस दल महाराष्ट्रात प्रथम**

**Police Station** :- **Dial 112 Washim**

**Date of Good Work done** :- **07/06/2022**

**Brief of the work done :-**

'Dial 112' प्रकल्पामध्ये प्रतिसाद वेळेत वाशिम जिल्हा पोलीस दल महाराष्ट्रातून प्रथम क्रमांकावर आहे. त्यामुळे मा. पालकमंत्री ना. श्री. शंभूराज देसाई यांनी टीम Dial 112 चे व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे कौतुक केले. यावेळी पोलीस उपमहानिरीक्षक अमरावती परिक्षेत्र, अमरावती मा. श्री. चंद्र किशोर मीणा व जिल्हाधिकारी, वाशीम मा. श्री. शण्मुगराजन एस. हजर होते.

## जिल्ह्याची कामगीरी कौतूकास्पद!

❖ पालकमंत्री शंभूराज देसाई यांचे प्रतिपादन
❖ डायल ११२ मध्ये वाशिम राज्यात प्रथम

देशोन्नती वृत्तसंकलन...



**वाशिम** ■ वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासोबत संकटात अथवा अडचणीत सापडलेल्या व्यक्तींना तातडीने सहाय्य करण्यासाठी आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा डायल ११२ च्या माध्यमातून पोलीस विभाग काम करीत आहे. वाशिमसारख्या छोट्याशा जिल्ह्यात डायल क्रमांक ११२ च्या माध्यमातून करण्यात येत असलेले पोलीसांचे कार्य निश्चितपणे अभिनंदनीय आणि कौतूकास्पद आहे. असे प्रतिपादन गृहराज्यमंत्री (ग्रामीण) तथा पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी केले.

सोमवार ६ जून रोजी पालकमंत्री देसाई यांनी दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून पोलीस अधिक्षक कार्यालय येथे वाशिम जिल्हा डायल ११२ मध्ये राज्यात प्रथम आल्याबद्दल पोलीस अधिक्षक बच्चनसिंह यांचेशी संवाद साधून अभिनंदन केले. यावेळी देसाई बोलत होते. अमरावती परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक चंद्रशेखर मीणा हे अमरावती येथून तर पोलीस अधिक्षक कार्यालयातून जिल्हाधिकारी षन्मुगराजन एस., सहायक पोलीस अधिक्षक महक स्वामी व उपविभागीय पोलीस अधिकारी, वाशिम यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

ना. देसाई पुढे बोलतांना म्हणाले, यापूर्वी वाशिम भेटीदरम्यान डायल ११२ क्रमांकाचा अनुभव आपण घेतला आहे. ज्या व्यक्तीने या क्रमांकावर मदतीसाठी पोलीसांना सहकार्य मागीतले होते. त्या व्यक्तीच्या मदतीसाठी काही मिनिटातच पोलीस पोहचले. त्या व्यक्तीला संबंधित पोलीस स्टेशला आणून सहकार्य केल्याचे आपणाला त्या व्यक्तीने सांगितले. अत्यंत तत्परतेने व तातडीने या क्रमांकाच्या माध्यमातून मदत केली जात आहे. मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्या नेतृत्वातील महाविकास आघाडी सरकार पोलीसांच्या मुलभूत सोयीसुविधांकडे लक्ष देत आहे. पोलीसांना कर्तव्यकाळात आवश्यकतेनुसार दुचाकी आणि चारचाकी वाहने उपलब्ध करुन दिली आहेत. त्याचबरोबर पोलीसांची निवास व्यवस्था व पोलीस स्टेशन इमारती व्यवस्थेच्या कामावर भर देण्यात येत असल्याचे ना. देसाई यांनी सांगितले.ज्यांना पोलीस विभाग डायल ११२ च्या माध्यमातून मदत करतो ते व्यक्ती मदतीबद्दल समाधानी आहेत हे पोलीसांनी बघितले पाहिजे असे सांगून श्री. देसाई म्हणाले, ज्यांच्यावर अन्याय झाला, जो संकटात सापडला अशा व्यक्तींना डायल ११२ च्या माध्यमातून पोलीस मदत करतात. डायल ११२ साठी काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचे करावे तेवढे कौतूक कमी आहे. यामाध्यमातून चांगले काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. डायल ११२ वर प्रतिसादाचा वेळ १५ मिनीटे ४८ सेकंदाचा आहे. आता तो १० मिनीटांवर आणण्याचे पोलीस अधिक्षकांचे नियोजन नक्कीच प्रशंसनीय आहे. पोलीस विभागात नवनवीन अशा प्रकारच्या कल्पना आणून 'सदरक्षणाय खलनिग्रहणाय' या पोलीसांच्या ब्रिद वाक्यानुसार प्रत्येक पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांने काम करावे. असे ते म्हणाले.

यावेळी डायल ११२ कक्षाच्या सहायक पोलीस निरिक्षक मनिषा तायडे यांचेसह कक्षातील पोलीस कर्मचारी व तांत्रिक कर्मचारी उपस्थित होते. वाशिम जिल्हा डायल ११२ मध्ये राज्यात प्रथम क्रमांकावर असल्याबाबतचा आनंद यावेळी केक कापून साजरा केला. डायल ११२ च्या कक्षातील कर्मचाऱ्यांनी यावेळी केक कापला. पोलीस अधिक्षक बच्चन सिंह यांना जिल्हाधिकारी षन्मुगराजन एस. यांनी केक भरविला. (ता.प्र.)